# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.08.2024** **वारःशनिवार**

---

1. नव्या गुन्हेगारी कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे देशात न्यायदानाचं नवीन पर्व सुरू झालं - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
2. देशातल्या महत्त्वाच्या आठ रस्ते प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी; पुण्याजवळच्या नाशिक फाटा-खेड उन्नत मार्गिकेचाही समावेश
3. छत्रपती संभाजी नगर आणि धाराशिवच्या नामांतराला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली
4. अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून 596 कोटीचा मदतनिधी जाहीर
5. पॅरीस ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनची पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक आणि
6. भारत-श्रीलंका पन्नास षटकांचा पहिला सामना बरोबरीत

**राज्यपाल परिषद**

तीन नव्या गुन्हेगारी कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे देशात न्यायदानाचं एक नवीन पर्व सुरू झालं आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. राष्ट्रपतींच्या हस्ते काल नवी दिल्लीत दोन दिवसांच्या राज्यपाल परिषदेचं उद्घाटन झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. समृद्ध लोकशाहीसाठी केंद्र सरकारच्या विविध यंत्रणांनी सर्व राज्यांसमवेत समन्वयानं काम करणं गरजेचं आहे. हा समन्वय राखण्यासाठी आपण राज्यांचे प्रमुख म्हणून कशाप्रकारे सहाय्य करू शकतो यावर राज्यपालांनी विचार करावा असा सल्ला त्यांनी दिला. राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षण संस्थांची गुणवत्ता आणि मूल्यांकन पद्धतीत सुधारणा करण्यावर भर देण्यात आला आहे. राज्यातल्या विद्यापीठांचे कुलपती म्हणून या सुधारणा घडवून आणण्यात आपलं योगदान द्या असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं. राज्यपालांनी आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडत कल्याणकारी योजना आणि विकास याबाबत लोकांमध्ये जागरुकता आणावी असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यावेळी म्हणाले. राज्यपालांनी केंद्र सरकार आणि राज्यं यांच्यातला उत्तम मध्यस्थ म्हणून काम करावं तसंच नागरिक आणि सामाजिक संस्था यांच्या सहकार्यानं वंचितांच्या कल्याणासाठी प्रयत्न करावेत असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं.

**केंद्रीय मंत्रिमंडळ**

देशात दळणवळणाची क्षमता वाढवण्याच्या उद्देशानं 8 महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. 936 किलोमीटर लांबीच्या या सर्व रस्ते प्रकल्पांच्या उभारणीसाठी 50 हजार 655 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्रातल्या पुण्याजवळच्या नाशिक फाटा-खेड उन्नत मार्गिकेचाही यामध्ये समावेश आहे. या प्रकल्पाच्या मंजुरीबद्दल केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत. 30 किलोमीटर लांबीच्या नाशिक फाटा ते खेड दरम्यानच्या आठपदरी मार्गिकेचा अंदाजित खर्च 7 हजार 8शे 27 कोटी रुपये आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि चाकण यांसारख्या प्रमुख आर्थिक

केंद्रांना जोडणाऱ्या या मार्गामुळे या भागाची दळणवळण क्षमता वाढण्यास मदत होईल, असं मोहोळ यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>नीट-सर्वोच्च न्यायालय</u>**

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची नीट यूजी परीक्षा पुन्हा घेण्याचे आदेश द्यायला सर्वोच्च न्यायालयानं काल पुन्हा नकार दिला. या परीक्षेत केवळ झारखंडमधल्या हजारीबाग आणि बिहारमधल्या पाटणा इथं गैरप्रकार झाला आहे. त्यामुळे संपूर्ण देशात पुन्हा परीक्षा घेण्याची गरज नाही असं मत सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठानं व्यक्त केलं.

**<u>नामांतर</u>**

औरंगाबादचं छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचं धाराशिव असं नामांतर करण्याला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली आहे. नाव देण्याचा आणि बदलण्याचा अधिकार कायद्यानं राज्य सरकारला दिला आहे असं मत नोंदवत, सर्वोच्च न्यायालयानं नामांतर प्रकरणात हस्तक्षेप करायला नकार दिला. जिल्ह्याचं नाव बदलायचं असेल, तर सूचना आणि हरकती मागवल्या जातात. मात्र औरंगाबादच्या नामांतराच्या वेळी असं घडलं नसल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला होता. मात्र, या प्रकरणी न्यायालयीन पुनरावलोकन करण्याची गरज नसल्याचं सांगून सर्वोच्च न्यायालयानं काल ही याचिका फेटाळली.

**<u>अवकाळी मदत</u>**

राज्यातील विविध भागात यावर्षी जानेवारी ते मे या कालावधीत अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना 596 कोटी 21 लाख 95 हजार रुपयांचा मदतनिधी वितरीत करण्यास राज्य सरकारने मंजूरी दिली आहे. शेतपिकांच्या नुकसान भरपाईसाठी निधीची मागणी करणारे प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडून सादर झाले होते; त्या पार्श्वभूमीवर मदतनिधी वितरीत करण्याचा निर्णय शासनानं घेतला आहे. अवकाळी बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट निधी जमा केला जाणार आहे.

**<u>मुख्यमंत्री</u>**

रक्षाबंधनाच्या सणापूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या खात्यात दोन महिन्यांचे पैसे जमा होतील अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड इथं या योजनेच्या लाभार्थी महिलांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचं वाटप करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>मराठी अर्ज-आदिती तटकरे</u>**

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेसाठी पात्र महिलांचे, मराठी भाषेमध्ये केलेले अर्ज ग्राह्य धरले जातील. मराठीमधले अर्ज नामंजूर होणार नाहीत, अशी ग्वाही महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. काही तांत्रिक अडचणीमुळे मराठी भाषेतील अर्ज स्वीकारले गेले नाहीत परंतु ही तांत्रिक अडचण आता संबंधित बँकेनं सोडवल्यामुळे मराठीमध्ये केलेले अर्जही स्वीकारले जातील असं तटकरे यांनी सांगितलं.

**<u>लाडकी बहीण</u>**

दरम्यान मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला स्थगिती द्यायला मुंबई उच्च न्यायालयानं नकार दिला आहे. या योजनेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर काल सुनावणी झाली; पुढची सुनावणी 6 सप्टेंबर रोजी होणार आहे.

**ऑलिम्पिक**

पॅरीसमध्ये सुरू असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी काल चमकदार कामगिरी करत भारतासाठी आणखी पदकं मिळवण्याच्या दिशेनं आगेकूच कायम ठेवली. बॅटमिंटनमध्ये लक्ष्य सेन यानं पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. काल झालेल्या सामन्यात त्याने चीनी तैपेईच्या प्रतिस्पर्धी खेळाडूचा 19-21, 21-15, 21-12 असा पराभव केला. ऑलिम्पिक स्पर्धेत बॅडमिंटनमध्ये पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश करणारा लक्ष्य सेन हा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.

नेमबाजीत मनु भाकरनं 25 मीटर पिस्टल प्रकारात 600 पैकी 590 गुण मिळवून अंतिम फेरी गाठली. हॉकीत शेवटच्या साखळी सामन्यात भारतीय पुरुष संघानं ऑस्ट्रेलियावर 3-2 असा विजय मिळवला.तिरंदाजीच्या मिश्र सांघिक प्रकारात अंकिता भकत आणि धीरज बोमदेवरा यांच्या जोडीला पराभवाचा सामना करावा लागला. कास्य पदकासाठी अमेरिकेच्या प्रतिस्पर्धी जोडीशी झालेल्या लढतीत त्यांचा 2-6 असा पराभव झाला.

**क्रिकेट**

भारत आणि यजमान श्रीलंका यांच्यातील पन्नास षटकांचा पहिला सामना काल रोमहर्षक बरोबरीत संपला. 231 धावांच्या विजयाच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा शेवटचा गडी अठ्ठेचाळिसाव्या षटकात 230 धावसंख्या असताना बाद झाला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेनं निर्धारित 50 षटकांत आठ गडी बाद 230 धावा केल्या. दुसरा सामना उद्या कोलंबोमध्ये होणार आहे.

**हवामान**

कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी आज जोरदार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्राच्या घाट भागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अती जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. दरम्यान, खडकवासला धरणाच्या सांडव्यावरुन मुठा नदीपात्रात होणार विसर्ग वाढवून पहाटे पाच वाजता, 21 हजार 142 क्यूसेक्स करण्यात आला. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार विसर्ग कमी-जास्त होण्याची शक्यता आहे असं पाटबंधारे विभागाकडून सांगण्यात आलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**